*This Question Paper contains 7 printed pages.*
***(Sections - A, B, C & D)***

Sl.No. 2743

# 03 (M)

**(MAY, 2021)**

***Time : 3 Hours]*** ***[Maximum Marks : 80***

**सूचना :**

1) हस्ताक्षर स्पष्ट लिहा.
2) या प्रश्नपत्रिकेमध्ये चार विभाग करण्यात आलेले आहेत. A, B, C आणि D व एकूण 1 ते 39 पर्यंत प्रश्न क्रमांक आहेत.
3) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत. प्रश्नांचे विकल्प आंतरिक आहेत.
4) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.
5) आवश्यक तेथे स्वच्छ आकृत्या काढा.
6) नवीन पानावर नवीन विभाग लिहा. प्रश्नांची उत्तरे अनुक्रमे लिहा.

## विभाग – 'A' (गद्य)

**1)** योग्य जोड्या जुळवा : **[4]**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| 1) क्रांतिकारकांची वज्रमुठ | अ) व्यक्ति चित्रण |
| 2) मारुतराया | ब) बखर |
| 3) एका नव्या यज्ञाचा उपासक | क) ग्रामीण कथा |
| 4) मराठ्यांचे आरमार | ड) नाट्यांश |

■ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :– [2]

2) चक्रधर स्वामींच्या लीला सांगितलेला कोणता पाठ तुम्हाला अभ्यासाला आहे?

3) शेक्सपिअरचे सुप्रसिद्ध वाक्य कोणते?

■ खालील प्रश्नांची दोन–तीन वाक्यात उत्तरे लिहा :– (कोणतेही तीन) [6]

4) लेखक दिलीप चित्रे ह्यांच्या मते कोणता खेळ अवघड होता? का?

5) तुरुंगातील गुन्हेगारांमध्ये सुधारणा व्हावी म्हणून सयाजीराव महाराजांनी कोणते प्रयत्न केले?

6) सावरकरांना अंदमानच्या तुरुंगात नेल्यावर त्यांनी जेलर बारीजवळ 'कोलूची शिक्षा' का मागितली?

7) गाडगेबाबांच्या मते 'स्वच्छता – यज्ञ' का आवश्यक आहे?

■ खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा :– (कोणतेही दोन) [8]

8) आजची मुले भविष्यातील मोठे नागरिक आहेत हे पटवून देण्यासाठी आजोबांनी काय केले?

9) गावातल्या लोकांनी वानराशी वाईट वर्तन का केले?

10) लेखक आनंद यादव ह्यांनी सुतकताई करताना आपल्या आई – वडिलांच्या कोणत्या आठवणी कल्पनेने रंगवून सांगितल्या?

## विभाग – 'B' (पद्य)

■ खालील दिलेल्या रिकाम्या जागा कंसातील योग्य विकल्प निवडून पूर्ण करा :- [4]

11) 'लावण्याचा पुतळा' ज्ञानेश्वरांनी .............. म्हटले आहे.

(शंकराला, विठ्ठलाला, गणपतीला)

12) बनफूल काव्यसंग्रह ........... ह्यांचा गाजला.

(पाडगावकर, बाबा आमटे, म.प.देशपांडे)

13) 'जमाखर्च स्वातंत्र्याचा' ही कविता ................ या काव्यसंग्रहातुन घेतली आहे.

(सलाम, जिप्सी, त्रिवेणी)

14) 'महामानव' हे संबोधन .......... ह्यांच्यासाठी आहे.

(गाडगेबाबा, बाबा आमटे, साने गुरुजी)

■ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :- [2]

15) पाडगावकरांच्या मते जनतेने कशाचा जाब मागायला हवा?

16) नारायण सूर्वे ह्यांची कोणती कविता तुम्हाला अभ्यासाला आहे?

■ खालील प्रश्नांची दोन – तीन वाक्यात उत्तरे लिहा :- (कोणतेही तीन) [6]

17) संत ज्ञानेश्वरांनी 'विराणी' तुन भक्ताची अवस्था कशी व्यक्त केली आहे?

18) भारतीय जवानाचे घर कसे आहे?

19) कवी मुरलीधर आमटे ह्यांनी महत्वाचे कोणते कार्य केले?

20) 'उर फोडूनिया तिनं पोटातुन यावं' असे इंद्रजित भालेराव का म्हणतात?

■ खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा :- (कोणतेही दोन) [8]

21) 'दुपार' कवितेतून कवी नेमके काय सांगू इच्छितात?

22) 'माणूस माझे नाव' ह्या कवितेतून कवी आमटे 'सुख बोचते' असे का म्हणतात?

23) जनतेने जागृत होऊन स्वातंत्र्याचा जमा-खर्च मागायला हवा असे पाडगावकर का म्हणतात?

## विभाग - 'C' (व्याकरण)

■ सूचनेप्रमाणे प्रश्नांची उत्तरे लिहा :-

24) वाक्य रूपांतर करा. [2]

अ) हे चित्र खूप छान आहे. (उद्‌गारार्थी करा)

ब) नेहमी सत्य बोलावे. (नकारार्थी करा)

25) समास ओळखा. (कोणतेही दोन) [2]

अ) भाजीपाला

ब) महासागर

क) पंचपाळे

26) समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन) [2]

अ) पांथ

ब) प्रासाद

क) धूर्त

27) विरूद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन) [2]

अ) शोषक

ब) देशद्रोही

क) आरंभ

28) अलंकार ओळखा. [2]

अ) पांढरा एकला फिरतो ढग,

पाहत खालचे विश्रब्ध जग।

ब) कर्णासारखा दानशूर कर्णच।

29) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही दोन) [2]

अ) वसा घेणे

ब) शब्दाला मान देणे

क) टर उडवणे

30) खाली दिलेल्या म्हणींचा अर्थ सांगा. [2]

अ) अडला हरी, गाढवाचे पाय धरी। ब) उथळ पाण्याला खळखळाट फार।

31) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द द्या. (कोणतेही दोन) [2]

अ) दगडाची पातळ कपची ब) निरुपयोगी अडचण करणाऱ्या वस्तू

क) तेल काढण्यासाठी बैलाच्या मानेवर ठेवण्याचे साधन

32) प्रयोग ओळखा. [2]

अ) शेतकरी शेती करतो ब) गवळ्याने गाईला बांधले

33) वृत्त ओळखा. [2]

अ) निघे दंडका राम कोदंडपाणी।

ब) आजीच्या जवळी घड्याळ कसले आहे चमत्कारिक।

## विभाग – 'D' (अर्थग्रहण / लेखन)

**34) खालील पैकी कोणत्याही एका विषयावर कल्पना विस्तार करा :–** **[4]**

1) मानव सेवा हीच ईश्वर सेवा।

2) देव भावाचा भुकेला।

**35) ऑनलाईन शिक्षण कसे वाटले? हे सांगणारे पत्र आपल्या मित्रास लिहा :–** **[4]**

**(पत्ता 5, 'मातृ – सदन', श्रीराम वाटिका, अलकापुरी, बडौदा)**

**खास सूचना :– (पत्रात कुठेही तुमचे नाव, पत्ता, सही यांचा उल्लेख करू नये)**

**36) खालील गद्य उतारा वाचून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :–** **[4]**

रवींद्रनाथांनी जीवनातील प्रत्येक कर्म कमालीच्या निष्ठेने केले. ते कवी होते, थोर कलावंत होते, पण त्याच्या जोडीला आदर्श गुहस्थाश्रमी होते. नियतीने सूड काढावा तसे गृहस्थाश्रमातले सारे आघात त्यांना सोसायला लावले.परंतु या आघातांनी त्यांच्या सार्वजनिक जीवनावर मळभ येऊ दिले नाही. सूर्यकिरणांनी ढगांचे काळे पडदे फाडून बाहेर यावे तसे रवीन्द्रही आपल्या प्रतिभेच्या तेजाने ही दु:खे फोडून बाहेर पडत. प्रत्येक कार्याची त्यांनी जणू ज्योत धरली होती.तिच्यावर वैयक्तिक दु:खाचे मालिन्य येऊ द्यायचे नाही,काजळी चढू द्यायची नाही या निर्धाराने हा कवी जगला. मनाचे जसे काही त्यांनी निरनिराळे लोखंडी कप्पे करून ठेवले होते. इकडच्या कार्याची तिकडे दाद नाही.दु:खाचे डोंगर छातीवर घेऊन हा महामानव गीते गात होता.लोकांना गायला लावीत होता. नाटके रचीत होता.कथा लिहित होता. सामाजिक व राजकीय चळवळीत भाग घेत होता. त्याच्या वैयक्तिक जीवनात जे – जे घडत होते, त्याच्याकडे 'कौतुक तू पाहे संचिताचे' म्हणत सामाजिक जीवनात आनंद वाटण्याची जबाबदारी नियतीने आपल्यावर टाकली आहे अशा भावनेने जगत होता.

प्रश्न :

1) रवीन्द्रनाथांचे गृहस्थाश्रमी म्हणून वैशिष्ट्य कोणते?

2) रवीन्द्रांनी कोणत्या परिस्थितीत साहित्यनिर्मिती केली?

3) नियतीने रवीन्द्रांना कसे वागवले?

4) रवीद्रांनी कोणकोणत्या भूमिका वठविल्या?

■ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर 200 शब्दांत निबंध लिहा :- **[8]**

37) <u>मी पाहिलेली महामारी</u> :- महामारीचा प्रकार ......... परिणाम ......... महामारीपासून वाचण्यासाठी घेण्याची काळजी .......... अनुभव ........... आपले विचार.

38) <u>मी पक्षी झालो तर</u> :- आकाशाशी जवळिक ....... विविध देश .......... प्रांत यातुन सैर .......... उंच उंच भराऱ्या ....... सळसळते जीवन ......... ठिकठिकाणचे सौंदर्य टिपणे ............ स्वैर स्वच्छंद विहार .......... पक्षीराज्याचा अभ्यास ........... मानवातील स्वार्थ, द्वेष, यापासून दूर ....... शांततामय जीवन!

39) <u>भारतीय शेतकरी</u> :- कृषीप्रधान भारत ...... शेतकऱ्यांना मानाचे स्थान ......... नाव ...... कुटुंब ......... सकाळीच शेतात जाऊन राबणे .......... पावसावर अवलंबून न रहाणे .......... आधुनिक साधनांचा शेतीसाठी वापर ........... भरपूर पीक ........... घरची परिस्थिति ........... त्याच्याबद्दलच्या तुमच्या भावना.

ⓘⓘⓘ